# महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ

(शासन मान्यता क्र.: आरजीए-१०९०/सीआर-१४/९०/१६-अ, दि. २४ ऑक्टोबर, १९९०)

**ग. दि. कुलथे** संस्थापक व मुख्य सल्लागार (९८६९२१२१५२)
**विनोद देसाई** अध्यक्ष (९९६७५७१८८५)
**समीर भाटकर** सरचिटणीस (९६१९९८७४२९)

द्वारा : तळमजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ ✆ : २२७९ ३९५२ टेलिफॅक्स : २२०४ ९९१४

Website : www.adhikarimahasangh.com | E-mail: mahasangh3@gmail.com | mahasangh4@gmail.com

प्रति, दि. २७ फेब्रुवारी, २०१८

**मा.श्री.के.पी.बक्षी,** अध्यक्ष, राज्य वेतन सुधारणा समिती,
९ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर नं. १, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

**विषय : राज्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे ७ वा वेतन आयोग...**

आदरणीय महोदय,

या महत्वाच्या समितीचे अध्यक्ष नात्याने आपली नियुक्ती झाल्याबद्दल आम्ही याद्वारे आनंद व्यक्त करु इच्छितो. आमच्या सूचना खालीलप्रमाणे :-

१) राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांना 'समयश्रेणी पदोन्नती' देण्याची आवश्यकता;
२) सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये सुधारणा करणे;
३) सारख्या स्त्रोतातून आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये वेतनसमानता राखणे;
४) राज्यसेवेतील अधिकाऱ्यांना 'सचिव' पातळीपर्यंतच्या वेतनश्रेणी मिळणे;
५) अतिरिक्त कार्यभारांसाठी उचित वेतन मिळणे;
६) उपदानातील (ग्रॅच्युईटी) वाढ देणे; ७) अर्जित रजा रोखीकरणाची योजना सुरु करणे;
८) 'भारत दर्शन' सुविधा मिळणे; ९) ८० वयानंतरच्या सेवानिवृत्तांना केंद्राप्रमाणे वाढी मिळणे;
१०) ७ वा वेतन आयोग केंद्राच्या तारखेपासून मिळावा, तसेच वेतननिश्चितीची पध्दतही त्यानुसारच व्हावी;
११) केंद्राप्रमाणे ५ दिवसांचा आठवडा; १२) सेवानिवृत्तीचे वय ६० करण्यात यावे;
१३) प्रशंसनीय कामाबद्दल आगावू वेतनवाढी वेळचेवेळी मिळाव्यात;
१४) अधिकाऱ्यांच्या पाल्यांनाही अनुकंपा तत्वावर सुविधा;
१५) केंद्राप्रमाणे महागाई भत्ता वाढी वेळचेवेळी मिळाव्यात;
१६) महिला कर्मचाऱ्यांसाठी केंद्राप्रमाणे बालसंगोपन रजा,
वरील क्र. १ ते १६ मागण्यांबद्दल टिप्पणी जोडलेली आहे.
१७) दि. १ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये महासंघाने आपणाकडे पाठविलेल्या ५१ अधिकारी संघटना तसेच, ५८ कर्मचारी संघटनांच्या निवेदनांचा विचार व्हावा.
ज्या संघटनांनी निवेदने पाठविली आहेत, त्यांना समक्ष मांडणीसाठीही पाचारण करावे.
**बक्षी समितीने त्यांचा अहवाल दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत शासनास द्यावा.**

**आपले,**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (ग.दि.कुलथे) | (विनोद देसाई) | (नितीन काळे) | (समीर भाटकर) | (मीना आहेर) |
| मुख्य सल्लागार | अध्यक्ष | कोषाध्यक्ष | सरचिटणीस | अध्यक्षा, दुर्गा म.मं. |

*टीप : वरील निवेदन दि. २७ फेब्रुवारी, २०१८ रोजीच पोर्टलवर पाठविले आहे. (पोहच प्राप्त)*

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ
(शासन मान्यता क्र.: आरजीए-१०९०/सीआर-१४/९०/१६-अ, दि. २४ ऑक्टोबर, १९९०)

ग. दि. कुलथे
संस्थापक व मुख्य सल्लागार (९८६९२१२१५२)

विनोद देसाई
अध्यक्ष (९९६७५७१८८५)

समीर भाटकर
सरचिटणीस (९६१९९८७४२९)

द्वारा : तळमजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ ✆ : २२७९ ३९५२ टेलिफॅक्स : २२०४ ९९१४
Website : www.adhikarimahasangh.com | E-mail: mahasangh3@gmail.com | mahasangh4@gmail.com

## प्रस्तावना :–

केंद्राच्या 7 व्या वेतन आयोगाच्या धर्तीवर राज्यातील अधिकारी–कर्मचारी यांच्या वेतनश्रेण्यांबाबत सर्वांगीण विचारविनिमय करुन, राज्य शासनास शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने दि. 17 जानेवारी, 2017 च्या निर्णयानुसार, मा.श्री.के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली वेतन सुधारणा समिती नियुक्त केलेली आहे. तसेच, दि. १७ जुलै, 2017 च्या निर्णयानुसार या समितीच्या कार्यकक्षा निश्चित केलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर, या समितीने 5 व्या व 6 व्या वेतन आयोगामध्ये ज्या त्रुटी राहिलेल्या आहेत, त्याही दूर करण्यासंदर्भात शिफारशी कराव्यात, असेही शासनाने त्यांना सांगितलेले आहे.

वरील पार्श्वभूमीवर, अधिकारी महासंघाच्या वतीने खालीलप्रमाणे निवेदन देत आहोत.

### 1) राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या 'समयश्रेणी पदोन्नती' देण्याची आवश्यकता :

केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत तर, राज्यातील अधिकाऱ्यांची नियुक्ती राज्य लोकसेवा आयोगामार्फत केली जाते. राज्य सेवेतील अधिकाऱ्यांना बढत्यांच्या ज्या संधी आहेत, त्यामध्ये कमालीची विषमता आहे. काही विभागांत 4–5 वर्षांत वरच्या पदाची बढती मिळते, तर काही विभागांत राज्य लोकसेवा आयोगामार्फत नियुक्त्या होऊनही 25–30 वर्षांपर्यंत बढती मिळत नाही.

उपरोल्लेखित पार्श्वभूमीवर, विविध विभागांतील राजपत्रित अधिकाऱ्यांची एक सर्वसाधारण स्वरुपाची तक्रार आहे. ती म्हणजे अन्य विभागांच्या तुलनेत त्यांना उशीरा पदोन्नती मिळते, कुंठितता मोठया प्रमाणावर आहे, पदोन्नतीसाठी प्रदीर्घ काळ थांबावे लागते.

यासंदर्भात अखिल भारतीय सेवांचा आढावा घेतला असता असे दिसते की, त्यांना समयश्रेणी पदोन्नती (4, 9, 13 व 16 वर्षे) लागू असल्याने भा.प्र.से. असो, भा.पो.से., भा.वन सेवा असो की, भा.ले. व ले.प. सेवा असो, त्यांना ठराविक कालावधीनंतर पदोन्नती मिळते. त्यामुळे बढत्यांसंदर्भात त्यांची सहाजिकच तक्रार नसते. साधारणतः 15–16 वर्षांनंतर अ.भा.सेवेतील गट

'अ' मध्ये आलेला अधिकारी 'सचिव' पदापर्यंत पोहचतो. राज्य शासनातील विविध संवर्गांतील यासंदर्भातील असमानता दूर करण्यासाठी अशाच प्रकारची समयश्रेणी पदोन्नती पध्दती लागू करणे अत्यावश्यक आहे. ही पध्दती लागू केल्यास, विविध संवर्गांतील चढाओढ संपुष्टात येऊन, प्रशासनात विश्वासाचे व विकास कामांसाठी पोषक वातावरण निर्माण होईल. राजपत्रित अधिकारी महासंघाची बक्षी समितीस आग्रहाची विनंती आहे की, त्यांनी महाराष्ट्र राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांना समयश्रेणी पदोन्नती पध्दती लागू करण्याची आवर्जून शिफारस करावी.

## 2) सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना **(Assured Career Progression)** :

अधिकारी महासंघाचा उपरोल्लेखित क्र. 1 चा प्रस्ताव म्हणजेच भारतीय प्रशासनिक सेवेतील अधिकाऱ्यांप्रमाणे समयश्रेणी पदोन्नती पध्दती लागू करण्याची मागणी मान्य करण्यास शासनास वेळ लागणार असेल तर, कुंठितता घालविण्यासाठी राज्यामध्ये 12 व 14 वर्षांच्या सेवेनंतर जी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अस्तित्वात आहे, तीमध्ये केंद्राप्रमाणे सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झालेली आहे.

अ) अराजपत्रित पदांमध्ये विविध संवर्गांतील निर्माण झालेली कुंठितता विचारात घेऊन राज्य शासनाने वर्ष 1992 पासून अराजपत्रित घटकांना 'कालबध्द पदोन्नती' लागू केली. अधिकारी महासंघाने केलेल्या अभ्यासपूर्वक व आग्रही मागणीनंतर राज्य शासनाने 1 ऑगस्ट, 2001 पासून रु. 5400/– ग्रेड पे पर्यंतच्या राजपत्रित अधिकाऱ्यांना ही योजना 'सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' या नावाने लागू केलेली आहे. त्यानंतर अधिकारी महासंघाने राज्य शासनाच्या वेळोवेळी आग्रहपूर्वक निदर्शनास आणलेले आहे की, केंद्रामध्ये ही योजना रु. 5400/– ग्रेड पेची अव्यवहार्य मर्यादा दूर करुन सर्वच संवर्गांना लागू करावी. त्यानुसार 7 जुलै, 2017 रोजी राज्याच्या विद्यमान मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यासंदर्भात गांभीर्यपूर्वक चर्चा झाल्यानंतर, याबाबतची कार्यवाही 2 महिन्यांत करावी, अशा स्पष्ट सूचना मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आहेत. वित्त विभागाने तसा प्रस्ताव उशीरा का होईना सादर केलेला आहे. आमच्या माहितीनुसार, ही मागणी शासनाने बक्षी कमिटीकडेच सोपविली आहे. योग्य प्रश्नांबाबतची ही चालढकल पूर्णपणे अन्यायकारक आहे. तरी, बक्षी कमिटीने यासंदर्भात स्पष्ट शिफारस करावी, अशी महासंघाची आग्रहाची मागणी आहे.

ही मागणी मान्य करताना संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या खात्यातील वरच्या पदाची वेतनश्रेणी मिळावी, अशी मागणी आहे. संबंधित खात्यांत बढती न मिळाल्यामुळे म्हणजेच, तिथली कुंठितता दूर करण्यासाठी ही उपाययोजना असल्यामुळे, बढतीचीच वेतनश्रेणी मिळावी.

वरीलप्रमाणे सुधारणा झाल्यास, राज्य शासनाच्या सेवेत गट 'अ' व गट 'ब' मध्ये सरळसेवेने अथवा पदोन्नतीने आलेल्या अधिकाऱ्यांना योग्य न्याय मिळेल.

ब) सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार कुंठितता घालविण्यासाठी, 12 व 24 वर्षांची सेवा ही मर्यादा आता केंद्राप्रमाणे 10, 20 व 30 वर्षांची सेवा अशी सुधारणा होण्याची नितांत आवश्यकता आहे. केंद्रामध्ये ही योजना म्हणजेच 10, 20, व 30 वर्षांच्या सेवेनंतर वरची वेतनश्रेणी अशी सुधारणा 6 व्या वेतन आयोगापासून लागू असून, 7 व्या वेतन आयोगातही त्यानुसारच ही योजना लागू आहे. उशीरा बढत्या मिळणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांमध्ये नैसर्गिकतः नैराश्याची भावना निर्माण होत असते. तसेच, सेवाकालावधीमध्ये एकूण 3 वेळा पदोन्नती मिळावी, अशी सर्वसाधारण अपेक्षा असते. हे विचारात घेऊन, सुधारणावादी बक्षी कमिटीने तशी आग्रही शिफारस करावी, अशी महासंघाची रास्त मागणी आहे.

## 3) सारख्या स्त्रोतातून आलेल्या, सारखी अर्हता असलेल्या, सारख्या गटातील अधिकाऱ्यांमध्ये वेतन समानता राखण्याबाबत :

राजपत्रित अधिकाऱ्यांची नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध विभागांत होते. समान अर्हता असणारे एकच परीक्षा देऊन एकाच गटात (गट 'अ' किंवा गट 'ब') नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये वेतनाबाबत समानता **(Parity)** राखण्याची गरज आहे. अन्यथा, त्यांच्यात चांगली वेतनश्रेणी मिळविण्याची स्पर्धा सुरु होते. त्याचा परिणाम प्रशासनावर होतो. तसेच, ज्या संवर्गांना तुलनेने कमी दर्जाची वेतनश्रेणी मिळते, त्यांच्यामध्ये नैराश्याची भावना निर्माण होते. शासनामध्ये आपली बाजू ऐकणारे कुणी नाही, अशी भावना बळावते. हे अर्थातच आदर्श प्रशासनाच्या दृष्टीनेही हितावह नाही. त्यासाठी समान अर्हता, समान गट, समान भरतीप्रकिया असलेल्या संवर्गांमध्ये वेतनाचे बाबतीतही समानता राखण्यात यावी.

## 4) राज्यसेवेतील अधिकाऱ्यांना 'सचिव' पातळीपर्यंतच्या वेतनश्रेणी अनुज्ञेय करणे :

राज्यसेवेतील अधिकाऱ्यांच्या कामाचे स्वरुप काहीही असले तरी, त्यांच्या वेतनश्रेणी सचिवांच्या वेतनश्रेणीपेक्षा कमीच असली पाहिजे, असा पायंडा पडलेला आहे. लोकसेवा आयोगाकडून स्पर्धात्मक परीक्षेच्या माध्यमातून सेवाप्रवेश करणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रदीर्घ सेवा झाली तरी, त्यांची वेतनश्रेणी मर्यादित स्वरुपातच ठेवली जाते. त्यांना सचिव स्तरावरील पदांची वेतनश्रेणी मिळण्याची संधी मिळाल्यास, क्षेत्रीय पातळीवर त्यांचा दीर्घ अनुभव असल्यामुळे, विकास कार्यासाठी विधायक उपयोग होऊ शकतो. त्यामुळे राज्यसेवेतील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणी सचिव पातळीपेक्षा कमीच असाव्यात, अशी मर्यादा असू नये, अशी मागणी आहे.

### 5) अतिरिक्त कार्यभारांबाबत :

राज्य शासनाने सर्व खात्यांतील अधिकारी–कर्मचाऱ्यांची सर्व रिक्त पदे तत्परतेने भरावीत, अशीच आमची अपेक्षा आहे. तथापि, प्रत्यक्षात त्यानुसार कार्यवाही होत नाही. परिणामी, विद्यमान अधिकाऱ्यांनाच रिक्त पदांचे कार्यभार दिले जातात. वित्त विभागाने अतिरिक्त कार्यभारांसाठी जास्तीत जास्त रु. 1500/– अशी मर्यादा ठेवलेली आहे. ही मर्यादा केवळ तुटपुंजीच नव्हे तर, अतिरिक्त कार्यभाराचे महत्व दुर्लक्षित करण्यासारखे आहे. यासंदर्भात अधिकारी महासंघाचा प्रस्ताव आहे की, सर्व रिक्त पदे वेळचेवेळी भरावीत व अतिरिक्त कार्यभार देण्याची वेळ येऊ नये. तथापि, तशी वेळ आल्यास, जबाबदारी 100% असल्यामुळे, अतिरिक्त कार्यभारासाठी ज्या पदाचा कार्यभार सोपविला जातो, त्या पदाच्या किमान 50% एवढा पगार अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या अधिकाऱ्याला देण्यात यावा. तसेच, याबाबतचे सर्व अधिकार संबंधित विभागप्रमुखांना असावेत. कारण, काही प्रकरणी मंत्रालयातील मंजूरी घ्यावी लागते व ती मिळण्यास खूपच अवधी लागतो.

अत्यावश्यकता असेल त्यावेळीही, एका व्यक्तीस, एकच अतिरिक्त कार्यभार दिला जावा. 6 महिन्यांपेक्षा अधिक काळ अतिरिक्त कार्यभार देऊ नयेत. त्याऐवजी, अशा अधिकाऱ्यांना त्या पदाचे मानीव वेतन देण्यात यावे. त्यासाठी नियमित पदोन्नती कार्यपध्दतीचा वापर करण्यात येऊ नये.

### 6) उपदानातील (ग्रॅच्युईटी) वाढ :

केंद्र शासनाने दि. 1 जानेवारी, 2016 पासून उपदानाची मर्यादा रु. 20 लाख केलेली आहे. राज्यात ही मर्यादा रु. 7 लाखांची आहे. ही रक्कम सरसकट सर्वांना रु. 20 लाख एवढी मिळणार नसून, ज्यांचा पगार वरचा आहे, त्यांनाच ती सुविधा व सेवानिवृत्तीच्या वेळी एकदाच मिळणार असल्यामुळे आता मात्र राज्य शासनाने उपदान वाढीची मर्यादा केंद्राप्रमाणे रु. 20 लाख करण्याबाबतचा निर्णय तत्परतेने घ्यावा, अशी शिफारस बक्षी समितीने करावी.

### 7) 'अर्जित रजा रोखीकरण योजना' पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता :

शासनाच्या समाजोन्नतीच्या विविध योजनांमध्ये दिवसेंदिवस वाढच होते आहे. तसेच, सुरु असणाऱ्या योजनांचे स्वरुप विस्तारित होत आहे. सर्वसाधारणपणे कोणत्याही एका क्षणी शासनातील सर्वच्या सर्व पदे भरलेली आहेत; रिक्त पदे शिल्लक नाहीत, अशी स्थिती केव्हाही नसते. कामाची गती व आवश्यकता लक्षात घेता, अशा रिक्त पदांवरील अधिकाऱ्यांची कामे प्रलंबित ठेवणेही शक्य नसते. त्यामुळे, तुटपुंज्या अतिरिक्त कार्यभार भत्याच्या बदल्यात (तोही अनेक प्रकरणी वेळेवर व पूर्णपणे मिळत नाही) त्या पदाचा संपूर्ण कार्यभार वाहण्याची जबाबदारी उपलब्ध अधिकाऱ्यांवर टाकली जाते, असा दैनंदिन व सार्वत्रिक अनुभव आहे. त्यामुळे बऱ्याचवेळा एकेका अधिकाऱ्याकडे एकापेक्षा जास्त अतिरिक्त कार्यभार असल्याचीही असंख्य उदाहरणे आहेत. अशा परिस्थितीत, कधी योजना राबविण्यातील अपरिहार्यता तर कधी अधिवेशन; कधी

न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा; तर कधी विविध बैठका अशा विविध कारणांमुळे अधिकाऱ्यांना हक्काच्या रजासुध्दा मंजूर करण्यात येत नाहीत. रजा पूर्वमंजूरीने उपभोगावयाच्या असल्याने, रजा मिळण्याची शक्यता धूसरच असते. परिणामी, बहुसंख्य अधिकाऱ्यांच्या रजा, रजेची कमाल मर्यादा ओलांडल्याने व्यपगत होतात व त्या पुन्हा कधीही उपभोगण्यासाठी उपलब्ध होत नाहीत.

उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करुन, राज्य शासनाने रजा रोखीकरण देण्याचे धोरण ठेवले होते. त्या निमित्ताने, अंशतः का होईना, आर्थिक भरपाई होऊन रजा व्यपगत होण्याचे प्रमाणही कमी होत असे. ही योजना अत्यंत स्तुत्य व अधिकाऱ्यांच्या व प्रशासनाच्याही हिताची होती. परंतु, राज्य शासनाने ती आता बंद केलेली आहे. वास्तविक, अशी योजना अस्तित्वात असणे, हे कायम कार्यमग्न रहाव्या लागणाऱ्या अधिकाऱ्यांकरीता फुफाटयात वाऱ्याच्या गार झुळुकीप्रमाणे होती. ती बंद करुन शासनाने अधिकाऱ्यांच्या कष्टाचे किंचित परिमार्जन करण्याचे साधन काढून घेतले आहे. त्यामुळे, सदर योजना पुन्हा लागू करण्याची व त्यायोगे अधिकाऱ्यांना किंचित समाधान पुन्हा मिळवून देण्याची आग्रही शिफारस मा.बक्षी समितीने आपल्या अहवालात करावी, अशी विनंती महासंघातर्फे करण्यात येत आहे.

## 8) 'भारत दर्शन' सुविधा :

राज्य शासनाने आपल्या अधिकारी–कर्मचाऱ्यांना 'भारत दर्शना'ची सुविधा दिलेली नाही. रजा कालावधीमध्ये आपला देश पाहण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे, राष्ट्रीय भावनेला पोषक असेच होणार आहे. आपल्या देशाबद्दलची तसेच, विविध राज्यांतील जनतेशी आपुलकीची भावना वृध्दींगत होण्यासाठी; देशाच्या विविध भागांच्या विकास कामांबाबत तुलनात्मक जाणीव निर्माण होण्यासाठी, अशी सुविधा अत्यावश्यक आहे. तसा निर्णय घेण्याची आग्रही शिफारस बक्षी समितीने करावी.

## 9) सेवानिवृत्तांबाबतचे निर्णय :

केंद्र शासनाने दि. 1 सप्टेंबर, 2008 च्या निर्णयानुसार, त्यांचेकडील सेवानिवृत्तांसाठी ऐतिहासिक महत्वाचे व स्वागतार्ह निर्णय घेतलेले आहेत. त्यानुसार, राज्य शासनानेही राज्यातील सेवानिवृत्तांसंबंधी केंद्राचे सर्व निर्णय केंद्राच्याच तारखांपासून व त्याच धर्तीवर लागू करावेत, अशी शिफारस समितीने आवर्जून करावी.

केंद्रातील निवृत्ती वेतनधारकांना निवृत्तीवेतनाचा दर 80 वयानंतर 20% अधिक; तर, 85, 90 व 95 वयानंतर अनुक्रमे 30%, 40%, व 50% वाढीव दराने निवृत्ती वेतन/कौटुंबिक निवृत्तीवेतन मिळू लागलेले आहे. तर, 100 वर्षे वयानंतर 200% निवृत्तीवेतन (म्हणजेच नियमित निवृत्ती वेतनाच्या दुप्पट) मिळू लागले आहे.

यासंदर्भात अधिकारी महासंघाच्या आग्रही पाठपुराव्यानंतर, राज्य शासनाने वय वर्षे 80 चे वर असणाऱ्या सर्वच सेवानिवृत्तांना केवळ 10% एवढीच वाढ दिलेली आहे. त्याऐवजी, केंद्राप्रमाणे निवृत्तीवेतन वाढीचा निर्णय होणे, अत्यावश्यक व गरजेचे आहे.

उतारवयामध्ये औषधोपचारासाठी लागणारा अधिक खर्च विचारात घेता, या स्वागतार्ह अशा सर्व सुधारणा राज्य शासनानेही तत्परतेने स्विकाराव्यात.

## 10) 7 वा वेतन आयोग केंद्राप्रमाणे केंद्राच्या तारखेपासून मिळावा, तसेच वेतननिश्चितीची पध्दतही त्यानुसारच व्हावी याबाबत :

अ) यासंदर्भात राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दि. 7 जुलै, 2017 रोजी त्यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या चर्चेमध्ये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाप्रमाणे 7 वा वेतन आयोगाचा लाभ दि. 1 जानेवारी, 2016 पासून देण्याचे निःसंदिग्धपणे मान्य केलेले आहे. याची नोंद बक्षी कमिटीने घ्यावी, अशी रास्त अपेक्षा आहे.

ब) विविध भत्त्यांसंबंधी : केंद्र शासनाने त्यांच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांना जे जे भत्ते लागू केलेले आहेत, त्याच तारखांपासून ते सर्व भत्ते राज्यात लागू व्हावेत, अशी आमची रास्त अपेक्षा आहे. त्याबाबतही बक्षी कमिटीने स्पष्ट शिफारस करणे अपेक्षित आहे.

## 11) केंद्राप्रमाणे 5 दिवसांचा आठवडा :

केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासकीय अधिकारी–कर्मचारी यांना 5 दिवसांचा आठवडा करण्याबाबत, 7 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करताना विचार करण्यात येईल, अशा स्पष्ट सूचना मा.मुख्यमंत्र्यांनी दि. 7 जुलै, 2017 रोजी दिलेल्या आहेत. ही बाब विचारात घेऊन बक्षी कमिटीने तशी शिफारस अहवालात करावी. याबाबतचा निर्णय अंतिम टप्प्यात असल्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी अधिकारी महासंघाच्या 32 व्या वर्धापन दिनी म्हणजेच दि. 7 फेब्रुवारी, 2018 रोजी सांगितले आहे. त्यानुसारचा निर्णय बक्षी कमिटीचा अहवाल येईपर्यंत शासनाने न घेतल्यास, बक्षी कमिटीने तशी स्पष्ट शिफारस त्यांच्या अहवालात करावी, अशी रास्त विनंती आहे.

## 12) सेवानिवृत्तीचे वय 60 करण्याबाबत :

राज्य शासनाने याबाबत मा.श्री.बी.सी.खटुआ यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केलेली आहे. या समितीने अधिकारी महासंघासह सर्व संबंधितांशी चर्चा करुन त्यांचा अहवाल तयार केलेला आहे. तो सकारात्मक असावा, असे दिसते. ही बाब विचारात घेऊन बक्षी कमिटीचा अहवाल सादर होईपर्यंत याबाबत शासननिर्णय न झाल्यास, समितीने तशी शिफारस करावी.

## 13) प्रशंसनीय कामाबद्दल आगावू वेतनवाढी :

अधिक चांगल्या कामासाठी प्रोत्साहन म्हणून, राज्यात तसा निर्णय यापूर्वी अस्तित्वात होता. शासनाने त्याबाबत काही सुधारणा करण्याचे घाटलेले आहे. केंद्रामध्ये अशी चांगली योजना सुरु असताना, राज्याने ती थांबविणे योग्य होत नाही, असे आम्हाला नम्रपणे वाटते. बक्षी कमिटीने याबाबत काही स्पष्ट सूचना कराव्यात, अशी अपेक्षा आहे.

## 14) अधिकाऱ्यांच्या पाल्यांना अनुकंपा तत्वावर नेमणुका देण्याबाबत :

यासंदर्भात यापूर्वी तरतूद होती. ती शासनाने रद्द केलेली आहे. ती पुन्हा सुरु करावी, अशी अधिकारी महासंघाची आग्रही मागणी असून, शासनप्रमुखांनाही ते पटल्याचे दिसते. तथापि, याबाबत मंत्रीमंडळ उपसमितीच्या अहवालाची प्रतिक्षा आहे. अनेकदा मुदतवाढ देऊनही उपसमितीने अहवाल दिलेला नाही. अधिकाऱ्याच्या सेवाकालात अकाली निधनानंतर अशा सुविधेची नितांत गरज विचारात घेऊन, शासनाने त्याबाबतचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस बक्षी समितीने आवर्जून करावी, अशी नम्र अपेक्षा आहे.

## 15) केंद्राप्रमाणे महागाई भत्ता वाढी देण्याबाबत :

यासंदर्भात दि. 1 जानेवारी, 2012 पासून राज्य शासन केंद्राच्या तारखेपासून व त्या दराने महागाई भत्ता वाढी देत आले आहे. महागाई सतत वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही गरज निर्माण झालेली आहे. आता, 1 जानेवारी ते जुलै, 2017 या 7 महिन्यांची तसेच, पुन्हा जुलै, 2017 ते जानेवारी, 2018 या 8 महिन्यांची थकबाकीही निर्णय होऊनही बाकी राहिलेली आहे. अशीच थकबाकी वाढत गेल्यास, अधिकारी–कर्मचाऱ्यांना आंदोलनाचा विचार करावा लागतो. या रास्त मागणीसाठी तशी वेळ येऊ नये, यासाठी बक्षी कमिटीने शिफारस करावी.

## 16) महिला अधिकारी–कर्मचाऱ्यांसाठी केंद्राप्रमाणे बालसंगोपन रजा :

राज्याच्या प्रमुखांशी दि. 7 जुलै, 2017 रोजीच्या चर्चेमध्ये, राज्यातील महिला अधिकारी–कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे 2 वर्षांची बालसंगोपन रजा देणे तत्वशः मान्य असल्याचे सांगितलेले आहे. त्यानंतर अधिकारी महासंघाच्या 32 व्या वर्धापन दिनी म्हणजेच दि. 7 फेब्रवारी, 2018 रोजी मा.मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, त्यांनी सदर धारिणीवर सही केलेली असून, त्याबाबतचा प्रस्ताव लवकरच मंत्रीमंडळ बैठकीत मंजूरीसाठी ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भातही उशीर झाल्यास, बक्षी कमिटीनेही आवर्जून शिफारस करावी, अशी विनंती आहे.